# अखेर विठोबाच्या दारी सर्जा-राजाची जोडी

## पुण्यातील 'शिवप्रभा ट्रस्ट', 'द बेटर इंडिया' संस्थांचा पुढाकार

जितेंद्र पाटील

ॲग्रो इफेक्ट

जळगाव : खाटेच्या साहाय्याने साऱ्या पाडून कपाशी लागवड करणाऱ्या खडकी बुद्रुक (ता. चाळीसगाव) येथील विठोबा मांडोळे यांच्या मदतीला जणू पंढरीचा विठोबा धावून आला आहे. त्यांच्या जिद्दीची आणि अडचणींना तोंड देणाऱ्या धैर्याची कथा 'ॲग्रोवन'मध्ये नुकतीच प्रसिद्ध झाली होती. त्याची दखल घेऊन पुण्यातील 'शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट', तसेच 'द बेटर इंडिया' या दोन सेवाभावी संस्थांनी विठोबाला थेट बैलजोडी देण्यासाठी पुढाकार घेतला. विशेष म्हणजे सर्जा- राजाची जोडी मांडोळे यांच्या दारी गुरुवारी (ता. ७) उभीसुद्धा राहिली.

विठोबा मांडोळे हे कपाशी लागवडीकरिता साऱ्या पाडणे गरजेचे असताना, भाड्याने बैलजोडी लावण्यासाठी खिशात पैसे नाहीत म्हणून निराश होऊन बसले नाहीत. निराशेचे जाळे झटकून त्यांनी चक्क लोखंडी खाटेच्या साहाय्याने शेतात साऱ्या पाडण्यासाठी कंबर कसली आणि तीन एकर शेतीत कपाशी लागवड पूर्णदेखील केली. नकारात्मक विचारांच्या गर्तेतून बाहेर निघाल्यावर कोणतीच अडचण प्रगतीच्या वाटेत अडथळा ठरू शकत नाही, हेच विठ्ठल यांनी आजूबाजूच्या शेतकऱ्यांना कृतीतून दाखवून दिले. हे वृत्त 'ॲग्रोवन'मध्ये प्रसिध्द झाल्याबरोबर त्याची चर्चा होवू लागली. पुणे येथील शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट व द बेटर इंडिया या सामाजिक संस्थांनी शेतकरी मांडोळे यांच्यासाठी अडचणीच्या



**खडकी बुद्रुक, जि. जळगाव : पुण्यातील शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट, तसेच द बेटर इंडिया यांच्या प्रयत्नांनी मिळालेल्या बैलजोडी समवेत विठोबा मांडोळे, सुलोचना मांडोळे, तसेच बालाजी हेंद्रे पाटील.**

ठरलेल्या बैलजोडीच्या विषयावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा विचार अमलात आणण्याचे ठरविले. मन्नाबी कतोच यांनी शेतकरी मांडोळे यांचे मनोगत सोशल मीडियाद्वारे मांडले. त्यास फेसबुक व व्हॉट्सॲपच्या माध्यमातून नेटिझन्सकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. आठवडाभरात बैलजोडी खरेदी करण्यासाठी आवश्यक वर्गणी हातोहात जमा झाली. त्या वर्गणीतून खरेदी केलेली बैलजोडी घेऊन संस्थेचे सदस्य बालाजी हेंद्रे पाटील हे अर्धापूर (जि. नांदेड) येथून खडकी बुद्रुक गावी गुरुवारी दुपारी पोचले. अर्थातच, सर्जा- राजाची जोडी दाराशी उभी राहिल्यानंतर विठोबा मांडोळे यांच्यासह कुटुंबीयांचा आनंद तर गगनात मावला नाही. विठोबा यांची पत्नी सुलोचना यांनी तर बैलजोडीचे औक्षणच केले.

सकाळ ॲग्रोवन मित्र ग्लोबल शिवाराचा.. आयोजित

Sanjeevani CInI TATA TRUSTS प्रायोजित

सकाळ ॲग्रोवन संवाद

'ॲग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद

कार्यक्रम वेळापत्रक

शनिवार, ता. ९ जुलै २०१६ रोजी

विषय : मका, सोयाबीन लागवड व व्यवस्थापन

वक्ते : डॉ. पंकज पाटील (विषय विशेषतज्ज्ञ, पीक संरक्षण, केव्हीके, धुळे)

डॉ. जगदीश काथेपुरी (कृषी विद्यावेत्ता, केव्हीके, धुळे)

स्थळ : शासकीय आश्रम शाळा, मु.पो. सुकापूर, ता. साक्री, जि. धुळे

वेळ : सकाळी ९.३० वा.

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

एकाच छताखाली मिळणार... कृषी कंपन्यांच्या डीलरशिपची सुवर्णसंधी!

आज भव्य शुभारंभ

सकाळ ॲग्रोवन

AgriDealers EXPO 2016

कृषी उद्योजक व्हायचंय का?

तर अवश्य भेट द्या

काय असेल प्रदर्शनात :

- अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्या सहभागी
- थेट संवादातून अपेक्षित कंपन्यांबरोबर करार करण्याची संधी
- संभाव्य व्यावसायिक भागीदारांना भेटण्याची संधी

प्रवेश शुल्क - रु. १००/-

Brand Promotion 2016

दि. ८, ९ व १० जुलै २०१६ | स्थळ : गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट, पुणे | वेळ : स. ११ ते रा. ८

- सहभागी कंपन्या -

FORCE DALWAN Orchard | Dr. Bawasakar Technology (Agro) Pvt. Ltd. | CEAT | रोहित परक | LG Engineers | पूर्वा केमटेक प्रा. लि. | ICICI Bank | HONDA Power Products

संजीवनी पशु खाद्य | Aqua Savio Evamulch - Evaloc | Multiline Agro Industries | Anumit Marketing | Gurudatta Agro Yuvraj | Saideep Group "All Packing Products under One-Roof" | Iris Polymers | PRADEEP NONWOVENS Only VIRGIN Polypropylene